# परिशिष्ट दुसरे

## कवी यशवंतांची इतर साहित्यसंपदा

यशवंत हे कवी म्हणून प्रसिध्द असले तरी त्यांनी गद्याचेही माध्यम हाताळले आहे आणि त्यात बरीच साहित्यनिर्मिती केली आहे. त्यांच्या काव्यकर्तृत्वानेच रसिक भारावले असल्याने त्यांच्या या साहित्याकडे कुणाचे सहसा लक्ष गेले नाही. त्यांनी गद्यपद्य स्वरुपात बालवाङ्मय लिहीले आहे. अनुवाद केले आहेत. कादंबरी, कथा, नाटक हे साहित्यप्रकार हाताळले नाहीत. अभिव्यक्तीसाठी गद्याचे माध्यम स्वीकारले इतकेच. त्यांची गद्यप्राय रचना त्यांच्या कवितेइतकी विपुल नाही. त्यांची काव्याशिवाय इतर असणारी साहित्यसंपदा अशी -

**बालवाङ्मय**

१) दरोडेखोर ? छे देवदूत

२) चाणाक्ष न्यायाधीश

३) भगवी गीता

४) अमलांगी

५) रंजना

६) अनंग-वासंती

ह्या गद्यगोष्टी आणि

७) मोतीबाण

हा बालगाण्यांचा संग्रह

**इतर गद्य-वाङ्मय**

१) प्रापंचिक पत्रे

२) कांतणीचे घर - लघुनिबंध

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | घायाळ | - | स्टिफन झ्वाइगच्या प्रदीर्घ कथेचा अनुवाद |
| ४) | वनवास | - | रिचर्ड कॉनरॉड यांच्या संक्षिप्त कादंबरीचा अनुवाद |
| ५) | हापिसर | - | सामान्य प्रापंचिकाचे असामान्य चरित्र कादंबरी रुप पुस्तकातून सांगितले आहे. वस्तुत: हे यशवंतांच्या वडीलांचे चरित्र आहे. मात्र तसा प्रत्यक्ष उल्लेख मात्र यशवंतांनी कुठेच केलेला नाही त्यांच्या जीवनाविषयी ज्यांना माहिती आहे त्यांना मात्र हे जाणवते. |
| ६) | समर्थ रामदास : एक अभ्यास | - | समर्थ रामदासांच्या साहित्याचा अभ्यास प्रबंधरुपाने केलेला आहे. |

## परिशिष्ट तिसरे

### यशवंतांना मिळालेले मानसन्मान

१) १९२१ ला कोल्हापूर येथे भरलेल्या पहिल्या महाराष्ट्र कवीसंमेलनात त्यांनी देहाचा पूल ही कविता गाऊन श्रोत्यांची मने जिंकली या त्यांच्या कवितागायनास त्यावेळी रौप्यपदक मिळाले.

२) १९४० साली ते बडोदे संस्थानचे राजकवी झाले.

३) १९५० च्या मुंबईत भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांना लाभले होते.

४) १९६० च्या दसऱ्याला त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते त्यांना 'महाराष्ट्र कवी' हा किताब बहाल करण्यात आला.

५) १९६९ ला भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा किताब दिला.

६) या शिवाय महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष म्हणून १९५८ ते ६१ पर्यंत काम पाहिले. एप्रिल १९४९ ते जून १९५० पर्यंत ते साहित्य परिषदेच्या पत्रिकेचे संपादक होते. १९५५ ते ५८ पर्यंत ते साहित्य परिषदेचे चिटणीस (कार्यवाह) होते.

७) साहित्य परिषदेतर्फे यशवंतांच्या स्मृतीदिनी उत्कृष्ट कविता संग्रहाला महाराष्ट्र कवी यशवंत पुरस्कार - १००१ रुपये दिला जातो.

## परिशिष्ट चौथे

## मुलाखात

काशीताई पेंढारकर ह्या यशवंतांच्या धाकट्या भगिनी. यशवंतांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू टळक होण्यास त्यांची मदत होईल म्हणून त्यांच्याशी केलेली ही बातचीत.

मी - यशवंतांच्या कवितेवर मी एक लघुशोधप्रबंध लिहीत आहे. यशवंतांच्याविषयी काही अधिक माहिती मिळेल म्हणून तुमच्याशी बातचीत करायला आले आहे.

काशीताई - त्यांच्याविषयी मी काय सांगणार ?. मी काही साहित्याची अभ्यासक नव्हे. साहित्य या प्रांतांशी माझा फारसा परिचय नाही. गणितासारखा रुक्ष विषयाची मी प्राध्यापिका कवितेतलं मला काय कळणार !

मी - त्यांच्या कवितेचा अभ्यास मी केला आहेच. पण त्या अभ्यासाला पूरक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू अधिक स्पष्ट व्हावेत अशी माझी अपेक्षा आहे.

उदाहरणार्थ : कुटुंबातील वडीलधारे म्हणून ते तुमच्याशी कसे वागले ?

काशीताई - आमची आई वारली तेव्हा मी खूप लहान होते म्हणून मला आजोळी नेल. इयत्ता चौथीपर्यंत माझं शिक्षण तिथे झालं पण नंतर मात्र नानांनी (यशवंतांनी) मला पुण्यात आणलं. त्यानंतर सर्व शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांच्याकडेच होते. माझं सर्व शिक्षण जिद्दीनं पूर्ण केलं. कारण त्यावेळी मुलींना जास्त शिकवण गैर मानील. पण मला शिकवलं. स्वतःला शिकता आलं नाही म्हणून आम्हाला शिकवलं.

मी - त्यांनी आणखी कुणाकुणाला शिकविलं ? स्वतः का शिकले नाहीत ?

काशीताई - वडील थकलेले होते, त्यामुळे मॅट्रीक झाल्यावर त्यांनी लगेच नोकरी धरली. त्यांचं ड्राफ्टींग चांगलं होतं. त्यांच्या वरिष्ठांच्या ड्राफ्टींपेक्षा वरचे अधिकारी ह्यांचच ड्राफ्टिंग पसंत करीत. मला शिकायला मिळाल नाही. पण मी तुम्हाला शिकविणार म्हणून त्यांनी आम्हा सर्वांना शिकविलं. वारसा हळक म्हणून मी तुम्हाला धनदौलत

पैसा देऊ शकत नाही पण शिक्षण तरी देईन असे म्हणत. आर्थिक स्थिती बेताचीच असल्यानं त्यांना चांगलं आर्थिक सहाय्य करणं शक्य नसे. आम्हाला स्कॉलरशिप फेलोशिप मिळत होती. पण प्रोत्साहन मात्र ते भरपूर देत. धाकट्या बंधूना एम.ए. पर्यंत शिकविलं. मला शिकविलं, धाकटे बंधू कुडानला होते. त्यावेळी त्यांचीही मुलं यांच्याकडे शिकली. एम.ए., एम.एस्सी. पर्यंत. स्नेह्यांची मुलं पुण्यात शिकायला होती. त्यांची गार्डीयनशिप स्वीकारली.

मी - त्यांच्या या आणि इतर कार्यात त्यांच्या पत्नींनी निराताईंनी त्यांना कशी साथ दिली ? पत्नीबद्दलची कृतज्ञता अनेक कवितातून व्यक्त झाली आहे. ती वास्तव होती का ?

काशीताई - त्यांनी यशवंतांना फार चांगली साथ दिली. त्या यशवंतांच्या द्वितीय पत्नी. प्रथम पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न केले म्हणून त्यांच्यावर बरीच टिका झाली. पण पहिल्या पत्नीकडून कौटुंबिक सुख मिळू शकले नाही. म्हणून हा दुसरा विवाह करावा लागला. निराताई नर्स होत्या तेव्हा जात्यांच सेवाभावी वृत्तीच्या होत्या. सोशिक होत्या. आजारपणात सर्वांची सुश्रुषा करीत. अगत्यशील वृत्ती होती. नातेवाईकांची मुलं त्यांच्याकड शिकायला होती किंवा आम्ही होतो सर्वांचं त्या मायेनं करीत.

मी - जन्मभूमीबद्दलचं म्हणजे चाफळबद्दलचं प्रेम, ओढही कितीतरी कवितातून व्यक्त झाली आहे. चाफळला नेहमी जात येत असत ?

काशीताई - वर्षातून एकदा तरी जायचे. चाफळविषयी प्रेम होतचं. दर वर्षी दसऱ्याच्या वेळी तिथे त्यांच्या काव्यगायन होई. ते तरुण असताना तर चाफळमध्ये त्यांनी यंग पार्टी स्थापन केली होती. ही पार्टी दिवाळीला नाटके करी. हे तिघेही भाऊ त्यात भाग घेत. धिप्पाड शरीरयष्टीमुळ यशवंत बहुतेक हिरो व्हायचे, रुक्मिणी स्वयंवर, कीचकवध अशी नाटके व्हायची. नोकरीमुळे ते तालमींना हजर नसत. दिवाळीची चार दिवसाचीच सुट्टी असे पण अचानक येऊनही काम चांगलं वठवीत.

वडीलांचाही नाटकात काम करण्याला विरोध नसे. ते सुधारलेल्या विचाराचे होते. वडीलांकडून पुरोगामी विचारांचा वारसा मिळालेला त्यामुळे घरातील सर्वजणच सुधारलेल्या विचारांचे होते.

मी - रविकिरण मंडळाच्या बैठका तुमच्या घरी होत का ? त्यांच्यातील परस्पर जिव्हाळ्याचे संबंध कसे होते ?

काशीताई - माधव ज्यूलियन, गिरीश, रानडे इत्यादी कवी घरी येत. त्यांच्या बैठका होत. काव्य गायन होईल, चर्चा होई, मला कवितेलं काही कळत नसल्याने आणि लहान असल्याने यापासून लांबच होते. एक विषय घेऊन त्यावर सगळ्यांनी कविता करायची, शाळेत निबंध लिहू तसं. हा उपक्रम चालत असे. अर्थात त्यात कसोटीला उतरले तिघे माधव ज्यूलियन, यशवंत आणि गिरीश. घाटे शिक्षण क्षेत्रात गेले, रानडे झुऑलॉजीचे प्राध्यापक होते. त्यांनीही काव्यलेखन सोडलं. माडखोलकर समीक्षेत गेले.

यशवंत आणि गिरीश यांच्यात मैत्रीचे संबंध होते. दोघे जोडीने काव्यगायनाचे कार्यक्रम करीत. गिरीश सांगलीला असूनही त्यांचं घरी नेहमी येणं जाणं असे, पत्रव्यवहारतरी चालू असे.

मी - नवोदित कवी यांच्याकडं येत का ?

काशीताई - तसे खूप लोक त्यांना नेहमीच भेटायला येत लोकांची वर्दळ त्यांच्याकडे नेहमीच असे. प्रकृती बरी नसली तरी त्यांच्याशी चर्चा करीत बसत. प्रकृती बरी नाही या कारणाने कुणाला परत पाठवायचे नाहीत नवोदित कवी यायचे सरीता पदकी, संजीवनी मराठे, नेहमी घरी यायची. पद्मा गोळे, वि.म. कुलकर्णी ही यशवंतांच्या वाढदिवासाच्या निमित्ताने दरवर्षी न चुकता येत. सरोजिनी वैद्य, शंकर वैद्य, इंदिरा संत हे महाविद्यालयात असताना येत असत.

मी - काव्यगायनाचे कार्यक्रम करणं कधीपर्यंत चालू होतं ?

काशीताई - त्यांच्या वयाच्या सत्तरीच्या सुमारास त्यांचं काव्य गायन थांबल प्रकृतीच्या अस्वास्थानं जमेना म्हणून.

मी - आणि लिखाण कधीपर्यंत सुरु होते ?

काशीताई - शेवटपर्यंत लिहीत होते. डायबेसिसमुळे शरीराने विकल झाले होते पण मेंदू शेवटपर्यंत ॲलर्ट होता. अगदी ते मृत्यू पावले त्यावेळीही दिवाळी अंकासाठी दहाबारा ठिकाणी लेखनं गेलं होतं, त्यांना मात्र ते छापून आलेलं पहायला मिळालं नाही. नवरात्रात ते पडले ते गेलेच. त्यांचा दुसरा मुलगा किशोर पेंढारकर आणि सून चारुता पेंढारकर यांनी कवितेचा वारसा जपला आहे.